शाश्वत शेतीतून गरीबीचे निर्मुलन

K. Subramanian, S Justin, T Johnson an K. Vijayalakshmi

तामिळनाडू मध्ये त्रिस्तरीय संस्थात्मक यंत्रणेद्वारे अल्पभुधारक शेतकऱ्यांना चांगल्या सेवा पुरविल्या गेल्या. प्रत्येक स्तरातील संस्थेच्या कार्य स्पष्टतेमुळे आणि त्यांच्यामधील सहसंबंधामुळे शेती संबंधी असणाऱ्या सामाजिक व आर्थिक मुद्दयांची उकल करण्यात मदत झाली. शेतकऱ्यांना संसाधन व सेवांची उपलब्धता वाढल्यामुळे उत्कर्षाकडे मार्गस्थ होणे शक्य झाले.

तामिळनाडू नागपट्टीनम, तीरूवणामलाई आणि कांचीपुरम या तीन जिल्यांमधील जनता गरीब असून शेतीवर अवलंबून आहे. पिकांचे कमी उत्पादन लागवडीवरील अधिक खर्च, सरकारी सेवेची कमी उपलब्धता आणि कमी बाजार भाव व चढउतारांमुळे या विविध कारणामुळे शेतकऱ्यांना शेती किफायतशीर राहीली नाही. एका पायाभूत अभ्यासात असे आढळून आले की, मुख्य पिके जसे भुईमुग आणि हरभरा पीकाची उत्पादकता कमी असून उत्पादन खर्च जास्त आहे. तसेच शेतीसाठी निधी व सेवांची मदत सुद्धा कमी उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत (भारतीय ज्ञान व्यवस्था केंद्र) या संस्थेने (वृत्ती उदरनिर्वाह संसाधन केंद्र) बंगरूळ यांच्या सहयोगाने अल्पभूधारकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी संयुक्तरित्या प्रकल्प सुरू करण्यात आला. हा प्रकल्प DFID च्या जागतिक गरिबी निर्मुलनाच्या निधीच्या माध्यमातून तसेच नेदरलंड येथील हिंवास यांच्या मदतीने राबविण्यात आला. या प्रकल्पाचा मुख्य भर असा होता की, स्वयंशाश्वत आणि तिचा दिर्घ परिणाम करणारी सामाजिक यंत्रणा/ पद्धती निर्माण करणे. सध्या हा प्रकल्प तीन जिल्हयातील 79 ग्रामपंचायतीतील 9218 शेतकरी कुटुंबाशी जोडला गेला आहे.

आदर्श नमूना (यंत्रणा)

गाव पातळीवर शेतकऱ्यांचे गट व विविध प्रकारची मदत पोहचविणारी जिल्हा स्तरावरील यंत्रणा म्हणजे ॲग्रो प्रोडयुसर कंपनी अशी याची अंमल बजावणी यंत्रणा होती. प्रगतीशील शेतकऱ्यांकडून शेती विषयक सेवा पुरविणाऱ्या गटास ग्रामीण कृषी व्यवसाय विकास सेवा पुरवठादार असे स्थान होते. प्रत्येक गावात शेतकऱ्यांनी असे पुरवठादार होते. हे पुरवठादार शेतकऱ्यांपर्यत विविध सेवा, योजना व अधिकार मिळवून देतात. तसेच उत्पादक कंपनी आणि शेतकऱ्यांमध्ये मध्यस्थीचे काम करतात. गाव स्तरावर शेतकऱ्यांचे जसे महिला बचत गट, पुरूष बचत गट, पुरूष-महिला बचत गट, एकत्रित देवाणघेवाण गट, शेतकरी मंडळ यासारखे प्राथमिक स्तरावरील विविध गट आहेत. हया गटांमध्ये 20-25 महिला व पुरूषांचा समावेश असून या गटांना शाश्वत शेती स्वयंसाहाय्यता गट संबोधतात. पंचायत पातळीवर प्रत्येक गटाचे प्रतिनिधी मिळून पंचायत कृषी विकास समिती असते. या मध्ये साधारण 12 ते 20 प्रतिनिधी सदस्य असतात. या समितीची प्रमुख भूमिका म्हणजे सर्व गटांमध्ये समन्वय साधणे व गटांच्या कामावर लक्ष ठेवणे . प्रान्तस्तरावर प्रांत कृषी विकास समिती असते. या समितीचे 20 ते 30 पंचायत कृषी विकास समितींचे प्रतिनिधी सदस्य असतात. एका प्रांतकृषी विकास समिती मध्ये जवळपास 15 ते 20 पंचायत कृषी विकास समित्या समाविष्ट असतात.प्रांतकृषी विकास समिती आपल्या आंतर्गत असलेल्या सर्व पंचायत कृषिविकास समित्यांच्या कामाचे समन्वयन व देखरेख करतात. जिल्हास्तरावर कृषी उत्पादक कंपनी उभारण्यात आली आहे. हया कंपन्यांचे मुख्य कार्य शेतकऱ्यांना विविध सेवा जसे विमा, सेंद्रीय



आता शेतकऱ्यांकडे 100 पेक्षा जास्त देशी तांदुळाच्या वाणाची उपलब्धता आहे.

प्रमाणिकरण, शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षणासोबतच चांगले उपजाऊ पायाभूत बियाणे पुरविणे, नितिष्ठा जसे कडुनिंब बियाण्याची पावडर, गांडुळखत, जिवाणूखते, जैविक किडनाशके, पोते, जनावरांचे खाद्य सभासदांना पुरविणे होय. सध्या 552 बचत गट, पंकृवि समिती (पंचायत कृषि विकास समिती), 5 प्रांत कृषीविकास समिती आणि 2 कृषीउत्पादक कंपन्या अस्तित्वात आहेत. या कृषीउत्पादक कंपन्याचे जवळपास 4000 सभासद आहेत. आम्हाला अशी अपेक्षा आहे की, हा प्रकल्प पूर्ण होतांना जवळपास 9000 प्रकल्पाचे महत्वाचे परिणाम उपभोक्ता या कंपन्यांचे भागधारक होतील.

पर्यावरण सुलभ कृषीपध्दतींचे अवलंबन

सगळयात वैशिष्टपूर्ण विकासाची बाब म्हणजे शेतकरी रासायनिक शेतीकडून वळून शाश्वत सेंद्रीय शेतीकडे वळत आहेत. संपुर्ण शेतकरी कुटुंबापैकी 15 टक्के रासायनिक शेतीकडून किडनाशक रहीत शेतीपद्धतीकडे वळले. आणि इतर 10 टक्के कुटुंब संपुर्ण सेंद्रीय शेतीकडे रूपांतरीत झाले. जवळपास 55 टक्के शेतकरी कुटुंबांनी प्रकल्पातील एकतरी शाश्वत शेती तंत्राचा/ पद्धतीचा अवलंब केला. सर्वच मुख्य पिकांचे व त्यांच्या वाणांचे आधारभूत पातळीच्या तुलनेत उत्पादन वाढले.

खर्चात कपात आणि उत्पन्नात वाढ

शेतीत कोणतेही बदल न करणाऱ्या गटाच्या तुलनेत पर्यावरण सुलभ कृषी पद्धतीने 7 टक्के उत्पादन खर्च घटला. जवळपास 4500 कुटुंबाचे निव्वळ नफा 15 टक्क्यापर्यंत वाढला. अंदाजे 107 शेतकऱ्यांनी 143 हेक्टरवर, (श्री) लागवड पद्धती अंमलात आणली. या पद्धतीमुळे उत्पादन खर्च रू. 1250/- प्रति एकर पर्यत घटल्यामुळे जिल्हास्तरावर रू 1,78,750/- बचत झाली. नागपट्टीनम जिल्हयातील 45 शेतकऱ्यांनी श्री पद्धत वापरल्यामुळे लागवड खर्चात एकरी रू. 1200/- प्रमाणे घट झाली. जिल्हास्तरावर (श्री) लागवड पध्दत अमलत आणल्यामुळे एकूण रू.54000/- रू.ची बचत झाली. महिलांनी 2000 पेक्षा जास्त परसबागा तयार केल्या असून त्यांनी सरासरी रू.300/- प्रति महिना मिळकत होत आहे. विविध उत्पादनाच्या मुल्यवर्धन प्रक्रियेत एकूण 305 लाभार्थी समाविष्ट आहेत.

सामुहिक गट

सामुहिक गट पुढाकाराने प्रकल्पातील क्षेत्राची व्याप्ती वाढत आहे. तीन जिल्हयात तेरा गांडुळखताचे प्रकल्प गट, सात जैविक किटनाशक उत्पादन गट, सात मुल्यवर्धिकरण उत्पादन गट कार्यरत आहेत, हया पैकी कित्येक गट विशेषतः गांडुळखत व मुल्यवर्धन गट महीलांच्या मालकीचे आहेत. हे



सिरकाझी लायम्माधुन्दाम गावात लोकांसोबत चालू असलेल्या चर्चा

उद्योग खेडयातील शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीची निविष्ठा वेळेवर किफायतशीर भावात वर्षभर उपलब्ध करून देतात. या गटामध्ये काम करणाऱ्या महिलांना आणि इतर मजूरांना त्यांच्या नियमित शेतकामाच्या मिळविती शिवाय दर महिन्याला अतिरिक्त उत्पन्न मिळत आहे.

यांत्रिक कृषी अवजारे उपलब्धता सुलभ झाली

14 पंचायतीमध्ये यांत्रिक कृषिअवजारांची उपलब्धता सुधारण्यासाठी कृषिअवजारे सुविधा केंद्रे उघडण्यात आली आहेत. या केंद्रामध्ये पॉवर टीलर, छोटा ट्रॅक्टर, ऑईल इंजिन्स, रोवणी यंत्र, ट्रॅक्टरवर चालणारे तण काढणी यंत्र आणि धान्य पाखडणी यंत्र. शेतकऱ्यासाठी उपलब्ध असतात बहुतेक कृषी नफा कमावित असून शेतकरी सेवाकरिता मोबदला देत असल्यामुळे आर्थिक दृष्ट्यासक्षम आहेत. उदा. पेरनामलुर पंचायतीत धानाच्या 1800 गोणी (144 टन) पाखडणी यंत्रणाने साफ करून दिल्या.

कृषिपर्यावरण पध्दतीचे अवलंबनासाठी सरकारचे दिर्घ काळाचे धोरण आवश्यक आहे. त्यासाठी 'अन्नसुरक्षा' आणि 'वातावरण बद्दल' या संबधातील धोरणामध्ये पर्यावरणीय शेती पद्धतीला महत्वाचे स्थान द्यायला हवे.

धान्य साफ केल्यामुळे त्याची प्रत सुधारली त्यामुळे प्रत्येक पोत्यामुळे 50-100 रूपयापर्यंत जास्त किंमत मिळाली. ह्या कृषीकेद्रांचा प्रकल्पांतर्गत न येणाऱ्या लाभार्थांना सुद्धा फायदा झाला.

निष्कर्ष

लहान व सिमांतिक शेतकऱ्यांच्या आवश्यक त्या सेवा पुरवणारी गाव पातळीवरील सेवादायी यंत्रणा (नमुना) ही शेतकऱ्यांना उत्तम व पाहिजे त्या सेवा पाहिजे तेव्हा पुरवू शकते. त्रिस्तरीय संस्थात्मक (पंचायत-समुह-जिल्हा) यंत्रणेद्वारे ॲग्रो प्रोडयुसर कंपनीने पुरविलेली कृषिनिविष्ठ आणि उत्पादन वेगवेगळया स्तरावर वेळेवर उपलब्ध केल्या जाऊ शकते. या यंत्रणेमधील प्रत्येक घटकांच्या (पंचायत कृषि विकास समिती, प्रांत कृषि विकास समिती, ग्रामकृषिउद्योग सेवादाना, बचतगट, सामुहिक देयता गट, किसान गट आणि कृषिउत्पादक कंपनी) भूमिका व कामे (समन्वय, देखरेख, ज्ञान वृद्धी, सेवा पुरवणे, वादातीत गोष्टींचे निराकरण यांची अत्यंत स्पष्टता आणि त्या सर्व घटकामध्ये असलेल्या आंगीक संबधामुळे हा संस्थात्मक ढाचा उत्तम काम करू शकला. शेतीशी संबधित सर्व आर्थिक व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक या यंत्रणेमुळे सहज शक्य झाली. स्थानिक प्रगतशील शेतकऱ्यांनी सेवा पुरविण्याचे काम केल्यामुळे विविध सेवा लक्षांकीत समाजापर्यंत कार्यक्षमतेने पोहचविण्यास मदत झाली. त्यांना सहकारी शेतकऱ्यांच्या स्थानिक संदर्भ, आवश्यकता आणि प्राथमिकतेची माहिती असल्यामुळे हे शक्य झाले. ग्रामीण कृषिव्यवसाय विकास सेवा पुरवठादार गटाच्या सेवांची उपयुक्तता कळल्यामुळे ते सेवांसाठी मोबदला मोजत आहे. शेतकरी सरकारी हक्क तसेच उधार व विमा इत्यादी विशेष सेवेसाठी सुद्धा पैसे मोजण्यास तयार आहेत.

ॲग्रो प्रोडयुसर कंपनीच्या मंडळात प्रतिनिधित्व, महिलांसाठी उद्योग प्रोत्साहन, महिलांचे कृषिव्यवसाय विकास सेवा पुरवठादार म्हणून नेमणूक झाल्यामुळे सामाजिक आर्थिक विकास, निर्णय घेणाऱ्या व्यासपीठामुळे महिलांचे सक्षमीकरण झाले. महिला कृषिउद्योग व विकास सेवा दातांमुळे तर महिलांमध्ये समानतेचे आणि सामाजिक मान्यतेची संवेदना जनतेत वाढली. गटनिर्मिती प्रक्रियेतील समावेशकता (शेतकरी व भूमिहिन दोघांनाही सदस्यत्व देणे) व संरचनेच्या वरच्या पातळीवरील भूमिहिनाची सहभागीत मुळे त्यांच्या आर्थिक लाभाच्या उपक्रमांची शक्यता निर्माण झाली व नफ्याचे समान वाटप शक्य झाले.

एकंदर या प्रकल्पाच्या उपलब्धी विशेष होत्या. आम्ही असे पाहिले की, सर्वच स्तरावरच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले, उत्पादकता वाढली, उत्पादन खर्च कमी झाला आणि प्रोडयुसर कंपनीचा निव्वळ नफा वाढला. ॲग्रो प्रोडयुसर कंपनीच्या नेत्यांमध्ये व्यवसायातील उपयुक्त संधी शोधण्याची व ओळखण्याची क्षमता विशेष वाढली. चर्चेमधील पारदर्शकता आणि सर्व समावेशक निर्णय घेण्याची क्षमता चांगलीच वाढली. नियमीत कामात, दस्तावेज हाताळणे, नेतृत्व गुण आणि बाह्यजगासोबत देवाणघेवाणाची पात्रता यामध्ये बरीच सुधारणा झाल्याचे आम्हाला आढळले. महिला बचत गटांचे लक्ष्य नुसत्या बचत व उधारीपासून वळवून ते शाश्वत शेतीच्या पद्धतीकडे वळविण्यात यश आले. एकूणच, हा प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांच्या कुटुंबाना गरिबीतून बाहेर काढून उन्नतीकडे मार्गस्थ करण्यास मदत झाली.

K. Subramanian, S. Justin, T. Johnson and K. Vijayalakshmi

Centre for Indian Knowledge Systems
No. 30, Gandhi Mandapam Raod,
Kottupuram, Chennai 600 085
Email : cikskazhi@gmail.com

Source : *Poverty reduction through sustainable agriculture, LEISA India Vol .16, No.2, June 2014*

मराठी अनुवाद : डॉ. विनोद खडसे



कांचीपुरम चे शेतकरी प्रायोगिक प्लॉट ला भेट देत असतांना